महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.२१/**११०६**

दिनांक : **१३/०१/२०२०**

**प्रति,**
**मुख्य अभियंता (नाप)**
**म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय.**
**नागपूर - ४४००१३.**

**विषय: स्पॅन्कोमुळे अतिरिक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठतेच्या मुद्यावर मार्गदर्शन.**

**संदर्भ:** १) मुअ/नाप/मासं/ १६३० दि. ०५.०४.२०१९.
२) मासंवि/रवका/न.क्र.०९/१७६१५ दि. २५.०६.२०१९.
३) मासंवि/रवका/न.क्र.०९/२८२४३ दि. ०७.१०.२०१९.
४) मुअ/नाप/मासं/४९३ दि. ०४.१२.२०१९.

नागपुर शहर परिमंडळामध्ये महाल, सिव्हील लाईन्स व गांधीबाग हे विभाग मे. स्पॅन्को कंपनीस फ्रँचायजी तत्वावरती देण्यात आले होते. त्यामुळे संबंधीत विभागातील अतिरिक्त ठरलेल्या मंडलनिहाय व विभागनिहाय ज्येष्ठतेमधील कर्मचाऱ्यांना नजिकच्या परिमंडळमध्ये स्थानांतरणाचे (प्रशासकीय बदली) आदेश जारी केले. सदर आदेशामध्ये कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता, म.रा.वि.वि.कं.मर्यादीत कर्मचारी ज्येष्ठता विनियम - २००५ च्या विनियम क्र. २१ (ख) नुसार निश्चित करणे बाबत निर्देश होते. कालातंराने काही कर्मचाऱ्यांची बदली सांघिक कार्यालयाने नागपुर शहर परिमंडलांतर्गत पदे रिक्त झाल्याने विनंती बदली करण्यात आली व कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता ही म.रा.वि.वि.कं.मर्यादीत कर्मचारी ज्येष्ठता विनियम - २००५ च्या विनियम क्र. २१ (क) नुसार निश्चित केली. त्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांकडून सेवाज्येष्ठते संदर्भात वारंवार विचारणा करण्यात येत असल्यामुळे तसेच सदरची बाब धोरणात्मक असल्याने संदर्भित पत्रान्वये मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती करण्यात आली आहे, यास्तव या प्रकरणी खालील निर्देश देण्यात येत आहेत.

२. **नागपूर परिमंडकडील फ्रँचायजीकरणामुळे, प्रशासकीय कारणास्तव बदली केलेल्या व पुन्हा मूळ विभाग/मंडलात बदली होऊन परत आलेल्या मंडल/विभागस्तरीय सेवाज्येष्ठता असलेल्या वर्ग ३ व ४ च्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता त्यांच्या मंडल / विभागातील मूळ सेवाज्येष्ठतेनुसार आबाधित ठेवण्यात यावी. मात्र जे कर्मचारी यापूर्वी मंडळ/विभागाबाहेर प्रशासकीय सोयीसाठी बदली झाल्याने गेले होते व ते मूळ मंडल / विभागात परतले आहेत, केवळ अशाच कर्मचाऱ्यांच्या बाबतीत "फक्त एक वेळेस" हा नियम लागू करावा."**

३. तरी उपरोक्त निर्देश विचारात घेउन संबंधीत कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता निश्चीत करण्याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही आपले स्तरावर करण्यात यावी.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**<u>प्रत सविनय सादर :</u>**

१) संचालक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई-४०० ०५१.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय. नागपूर-४४००१३

C:\Users\OUTSHRTP34\Downloads\Spanco letter.docx